# कुलाबा-वांद्रे-सीप्झ भुयारी मेट्रोच्या १३ स्थानकांचे खोदकाम पूर्ण

**मुंबई : प्रतिनिधी**

एमएमआरसीएलकडून मुंबईतील पहिल्या भुयारी मेट्रो मार्गाचे काम सुरू असून सध्या या मार्गावरील २६ पैकी १३ भुयारी मेट्रो स्थानकांचे १००% खोदकाम पूर्ण करण्यात यश आले असून उरलेल्या स्थानकांचे खोदकाम मेपर्यंत पूर्ण करण्यासाठी एमएमआरसीएलकडून प्रयत्न केले जाणार आहेत.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो मार्गिकेसाठी ५५ कि.मी.चे भुयारीकरण करण्यात येणार आहे. मेट्रो-३ मार्गिकेमुळे सहा व्यावसायिक केंद्रे, पाच उपनगरीय रेल्वे स्थानके, स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि लोकलने न जोडलेले परिसर जोडले जातील. आतापर्यंत कफ परेड, विधान भवन, चर्चगेट, हुतात्मा चौक, सीएसएमटी, सायन्स म्युझियम, सिद्धिविनायक, एमआयडीसी, मरोळ नाका, सहार रोड, सीएसएमआयए-आंतरदेशीय, सीएसएमआयए-आंतरराष्ट्रीय विमानतळ व सीप्झ या स्थानकांचे भुयारीकरण पूर्ण करण्यात एमएमआरसीएलला यश आले आहे.



● सध्या सुरू असलेल्या स्थानकांच्या कामाला लवकरच आणखी वेग येईल. उर्वरित स्थानकांचे खोदकामदेखील युद्धपातळीवर सुरू आहे आणि येत्या तीन ते चार महिन्यांत ते पूर्ण होईल, अशी माहिती संचालक (प्रकल्प) एस.के. गुप्ता यांनी दिली.

या १३ स्थानकांव्यतिक्त उर्वरित स्थानकांमध्ये काळबादेवी स्थानकाचे २६ टक्के, गिरगाव स्थानक १४ टक्के, ग्रांट रोड स्थानक ५६ टक्के, मुंबई सेंट्रल स्थानक ७३ टक्के, महालक्ष्मी स्थानक ७५ टक्के, आचार्य अत्रे चौक स्थानक ३९ टक्के, वरळी स्थानक ८२ टक्के, दादर स्थानक ८८ टक्के, शीतला देवी स्थानक ७१ टक्के, धारावी स्थानक ८१ टक्के, बीकेसी स्थानक ८३ टक्के, विद्यानगरी स्थानक ८७ टक्के, सांताक्रूझ स्थानक ९३ टक्के अशा तेरा स्थानकांचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे.